

# ओथंब ३

मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर

पुस्तकाचे नाव : ओथंब$^{३}$

लेख, मांडणी, सजावट : मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर

© मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर

(हे पुस्तक विक्रीसाठी नसून कोणत्याही प्रकारे या पुस्तकाची विक्री किंवा व्यावसायिक वापर करण्यापुर्वी लेखक/कवी आणि प्रकाशकांची परवानगी घेणं आवश्यक आहे)

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

**esahity@gmail.com**

इतर पुस्तकांसाठी व मासिकांसाठी **www.esahity.com** येथे भेट दयावी



## प्रस्तावना

पावसाचे मोकळे होणे ...

कुठल्या ना कुठल्या माध्यमातून व्यक्त होणे ही माणसाची उपजत असी वृत्तीच असते. राग, लोभ, दुःख अशा सगळ्या भावनांना व्यक्त करण्याला अभिव्यक्तीचे रुप येते तेव्हा त्यांस कुठेतरी कलेची झालर येते. रंगमंचीय आविष्कार असो वा लेखन प्रत्येक माध्यम माणसाला व्यक्त होण्याबरोबर एक अल्पशी वा व्यापक ओळख देत असते.

पाऊस हे व्यक्त–अभिव्यक्त होण्याचं एक व्यासपिठच आहे. पाऊस आला की कुणाला उमाळे फुटतात, कुणाला पावसाची शिसारी येते, तर कुणाला पावसाच्या अमुक एका रुपालाच स्विकारण्याची सवय असते.

मंजिरीने या पावसाला आपल्या शब्दांमध्ये बांधण्याचा एक सुंदर प्रयत्न केला आहे. बांधणे नाहीच खरेतर, तीने या पावसाला कागदावर अक्षरांमध्ये बागडायला मुक्त वाव दिला आहे. साध्या-सरळ प्रसंगांमधुन, शब्दांमधुन तीने पावसाला आपलसं केलं आहे. वेगळी वाट चोखाळून शब्दबंबाळ होण्याचा अट्टाहास मंजिरीने धरलेला नाही. रोजच्या जगण्याचे संदर्भ काव्यात्म शब्दांमधून मांडल्याने मंजिरीचे हे ललित लेख जिवंत तर वाटतातच पण आपलेसेही वाटतात. आपण पटकन रिलेट करु शकतो या लेखांशी स्वतःला. दडी मारुन दचकवू पाहणाऱ्या पावसाला मातीच्या सुगंधाचं गुपित सांगणं वा पावसात भिजु देण्याचा आईपाशी हट्ट करणं या गोष्टी आपण कितीही मोठे झालो तरी मनाच्या कोपऱ्यातुन जात नाहीत. त्यांची जपणूक मंजिरीच्या लेखांमधून दिसते. रोजच्या धबडग्यातून स्वतःसाठी थोडा वेळ काढून लिहायला जमणं हे तसं मुंबईकरांसाठी कठीणच. पण मंजिरीने ही धडपड सर्जनशीलतेसाठी केली यासाठीसुद्धा तीचं लेखन वाखाणण्याजोगं आहे. पावसाच्या लहरी स्वभावाप्रमाणे मंजिरीच्या लेखांमध्येही लहरीपणा तरलपणे जाणवतो. त्यात एक सहज जाणवणारी लय सापडते, त्यामुळे चहाचा आस्वाद घेता घेता तीचे लेख वाचणे हा अत्यंत आनंददायी अनुभव आहे.

... प्रियांका डहाळे



# मनोगत ...

रसिकहो,

नमस्कार,

मी, मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर, 'ओथंब – भाग ३' आणला आहे, पुन्हा तुमच्यासोबत पाऊस शेअर करायला. यंदा पाऊस उशिराचं आला नाही? अगदी मृग नक्षत्रापासुन पहिली काही नक्षत्र कोरडीच गेली. सारं चराचरंच त्याची वाट पाहत होतं. अल् निनो ने पावसाला अर्धमेलं केलं म्हणुन मृग नक्षत्रापासुन तो आलाच नाही, आता आला तो थोडं हृष्टपृष्ठ होऊन, अन् बरसायला सुरुवात केली. नुकताच आलाय तो पण अजुन माझीही मनसोक्त गळाभेट नाही झालीय, पाहुया आता कधी भेटतोय ते.

हल्ली फारचं विचित्र वागायला लागलाय तो. कसला राग आलाय त्याला कोण जाणे, गेल्या वर्षीचा आलेला तो रेंगाळला उशिरापर्यंत, इतका की त्याचा कंटाळा यायला लागला, त्याच्यापासुन नुकसान होऊ लागलं, त्यामुळे काही शेतकऱ्यांनी तर आत्महत्या केल्या, त्यांची घरादाराची वाताहात झाली, त्यांची पोर–बाळं पोरकी झाली, असा तो साऱ्यांच्या डोक्यात जायला लागला, लोकं आता आपला राग करातायत, आपण त्यांना आता तरी नको हवे आहोत हे त्याच्या लक्षात यायला लागलं अन् तो अजुनचं बिथरला आणि चक्क गारपिटीचा मारा करायला लागला. यामुळे आणखिनचं नुकसान झालं शेतकऱ्यांचं, मात्र आपल्या महाराष्ट्रात काही ठिकाणी काश्मिर अवतरलं. पाण्याच्या थेंबाऐवजी बर्फाचे खडे त्याने आपल्याला भेट दिले.


थोडं अवांतर झालं ना? मी ही आता या पावसासारखीच विषय सोडून भलतीकडेच बरसायला लागलीय हे आलंय लक्षात माझ्या. तर रसिकहो, यावेळी मी सुद्धा पावसा सारखी वागलेय. आता ओथंबच्या ३ ऱ्या भागात मी पाऊस कविता न आणता लेख आणलेत तुमच्या भेटीसाठी. पावसाबरोबरचा संवाद आहेच या पुस्तकात, सोबत गावातील नववधु, शहरातील नुकतीच लग्न झालेली, नोकरी करणारी सखी, निर्सगात रमणारी मैत्रिण, पावसासोबत भिजायला मिळावं म्हणुन आईच्या मागे लागणारं बाल्यं, आयुष्याच्या उत्तरार्धात एकमेंकाच्या सोबतीने अनेक पावसाळे पाहिलेले, आता सोबतचं खिडकीतुन पाऊस पाहणारे आजी-आजोबा आहेत. अर्थातच सारेच लेख काल्पनिकच. मागच्या ओथंब भाग १ आणि २ प्रमाणेच ओथंब चा हा ३ रा भागही सर्वांना आवडेल असं मी मनापासुन समजते, अर्थात ओथंब ३ तुम्हाला आवडल्याचे-नावडवल्याचे अभिप्राय घेऊन आपण मला ईमेल्सच्या मार्फत भेटालंच, मी वाट पाहतेय तुमच्या अभिप्रायाची.

रसिकहो, मनपुर्वक धन्यवाद, ई-साहित्य प्रतिष्ठानचे नामकाका अर्थात श्री.सुनिल सामंत यांचे आभार, तसेच त्या अनोळखी मित्र-मैत्रिणींचे आभार ज्यांनी नेटच्या महाजालात अपलोड केलेले फोटो मी माझ्या ओथंब ३ साठी वापरले.

थांबते ... आमच्या दोघांच्या सवडीनुसार जसा वेळ मिळेल तसं आम्ही भेटूच, तुम्हीही भेटाल तर तुम्हालाही भेटेलंच तो कुठेही, अन् चिंब भिजवुन टाकेल तो आपल्या प्रेमाने.

कळावे लोभ असावा ही विनंती,

मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर,
**manjee15@yahoo.com**



# अर्पणपत्रिका

ओथंब ३ हे ईबुक माझ्या त्या
मित्र–मैत्रिणीसाठी जे माझ्यासाठी नेहमीच
जिवलग आहेत परंतु सध्या ते दुरावलेत, मी
त्यांच्या आठवणीत नेहमीच रेंगाळत असते,
त्यांना हे पुस्तक समर्पित.

अंतर फार झाले तरी आस तुझी मनाला
वाट पाहताना झाले डोळे फितुर पावसाला
बांध फुटलाच आता, आला अश्रूंचा पुर
सावर तु मला, नको जाऊस कधी दुर ॥

मंजिरी सदाशिव सुशिला दाभोळकर



## अनुबंध


१) पावसाबरोबर गप्पा

२) पावसासोबतचे भटकंतीचे प्लान्स्

३) पावसासमवेत वाढदिवसाची पुर्वसंध्या

४) गावचा पाऊस

५) बाल्य

६) उत्तरार्ध

## १) पावसाबरोबर गप्पा



हळुच चोरपावलांनी लपाछपी खेळत येतोयस तु. तुला वाटत असेल असं दडी मारत आल्यामुळे कोणाला कळणार नाही आपण आल्याचं, मग पटकन टपटपते मोठाले थेंब टाकुन सर्वांना अचानक भिजऊन केलेल्या फजितीचा आनंद तुला घेता येईल. तुझ्यापासुन स्वतः वाचवण्याचा चान्स्च देत नाहीस तु कधी कधी, छत्री काढेपर्यंत, किंवा कुठे आडोश्याला उभं राहण्याची संधीच देत नाहीस, भिजवुनच टाकतोस तु. अरे पण सायबा, तु जरी लपत–छपत दडी मारत येत असलास तरी तुझ्या येण्याचा गंध आमच्यापर्यंत पोहोचतोच. थोडासा जरी शिडकावा केलास ना तु जमिनीवर तरी ती लगेच तुला फितुर होते अन् तुमच्या मिलनाचा गंध तिला येतोच, यालाच आम्ही म्हणतो, ‘मातीचा किती छान सुगंध येतोय’.



खरं तर तुझ्या येण्याचीच सारे वाट पाहत असतात. तुझे वेध लागलेले असतात. तु येण्याआधीच तुझ्याबरोबर चार महिने कसं राहायचं याची प्रत्येक जण आपापल्या बाजुने करत असतो. गावात खेडयापाडयात शेतकरी तर तुझ्या येण्याची आस लावुन बसलेला असतो. तु यायचा म्हणुन त्याने आपली शेतातली पेरणीच्या अगोदरची कामे उरकुन घेतलेली असतात अन् तो पेरणीच्या तयारीत असतो. घरावर–शेतघरांवर–गोठयावर शाकारणी झालेली असते. येथे शहरांत चाळींमधुन–झोपडयांमधुन छपरांवर प्लास्टिक अंथरले जाते. इमारतीच्या गच्चीवर डांबर घातलं जातं. हे झालं तुझ्या वास्तव्याच्या चार महिन्यांसाठीच तुझ्यापासुन थोडंस निवासी संरक्षण म्हणजे छत्र्या–रेनकोटस्–विन्ची, पावसाळी पादत्राणे घेणं, इत्यादी–इत्यादी.





बाकी प्रत्येकाचे भटकण्याचे मनसुबे ठरलेले असतातच. तु सोबत असताना कुठे, कोणासोबत जायचं ते. तुझे पण असे काही प्लान्स् असतात का रे? कडाडणाऱ्या  कडकलक्ष्मी वीजबाईंना घेऊन मस्त डोंगरदऱ्यांत भटकायला जायचं अन् मुसळधार कोसळून पाण्याचा जोरदार  आवाज करीत खोल दरीत वेगाने उतरायचं. भन्नाट ना! तु जेव्हा असा कोसळत असतोस तेव्हा काही वेडे वीर (यांत आम्ही मुली सुद्धा हा!) डोंगरदऱ्यांत, घाटमाथ्यावर तुला भेटायला येतात अन् तुझ्यासोबत मस्त धुक्यातुन भटकंती करतात, त्यावेळी तु कधी कधी ढगांनाही सोबत आणतोस म्हणे, त्यामुळेच तर ढग आमच्या हातात येतात, आणि आम्ही म्हणु शकतो आमचे आकाशाला हात लागले.

बरं चल, भेटुच आपण ...

## २) पावसासोबतचे भटकंतीचे प्लान्स्



पिया बसंती रे काहे सताये आजा ...............
टिव्हीच्या म्युझिक चॅनलवर मस्त गाणं सुरु होतं ...
हे गाणं खुप वर्षांपुर्वी प्रथम पाहिलं तेव्हा ते गाणं पाहताना, ऐकताना, स्क्रिनवर दिसणारा हिरवागार निसर्ग, रिमझिम पडणारा पाऊस अन् वनराईतुन जाणारी गाडी तेव्हा तीला वाटलं होतं, आपल्यालाही असं कधी भटकायला हवं, त्यावेळी असाच मध्यम-मध्यम रिमझिम-रिमझिम पाऊस असेल, चहूकडे थेंब-थेंब पाऊस अंगावर ल्यालेली हिरवळ असेल, दाटलेले धुकाळ ढग, मस्त रोमँटिक समॉ असेल अन् या अशा प्रवासात त्याची सोबत ...

पण कसलं कायं, पावसाच्या आधीच खुप सारे प्लान्स् बनवले भटकण्याचे, जवळपासचे स्पॉटस् नेटवरुन शोधुन ठेवले, पण वेळ कोणाला आहे? कामचं इतकं, शिवाय त्यात आयत्यावेळी निघालेली इमरजन्सी कामे, वेळचं नाही, रोमँटिक पाऊस अन् पावसातला रोमँटिझम् अनुभवायला.

तिचे मनातले मांडे मनातच राहिले, कुठेतरी तिला मनातुन वाटलंही की हा पावसाळा असाचं कोरडा जाणार की काय? काहीही हळव्या, ओल्या गोड आठवणी न देता. ...... **B + positive** तिने स्वतःला बजावलं. अरे आता कुठे आषाढ सुरु झालाय, आषाढातला झिम्माड पाऊस, त्याच्यासोबत अनुभवायचाय, नंतर येणारा मनभावन श्रावण आहेच. श्रावणातली रिमझिमही हवीय त्याच्यासोबत. भाद्रपद–अश्विनमधील घरा–दारात सणवार असताना मध्येच येणारी पावसाची सर त्याच्यासोबत अंगावर घ्यायचीय.



तिने ठरवलं आता त्याच्या वेळेवर आक्रमण करायचं. पाऊस तर पाहूणा होता अन् तो तर तिचा होता, पाहुण्यासोबत यजमानाला एकत्र आणायचं म्हणजे तिलाच त्याच्या वेळेवर आक्रमण करायला हवयं तरच हे दोघे एकत्र येतील अन् या दोघांच्या प्रेमात तिला चिंब भिजता येईल. मनात हे विचार असतानाच त्याचा **sms** आला, रविवारी माळशेज घाटात जाण्याचा प्लान पक्का झाला होता. अगदीच पिया बसंती ............ गाण्यासारखं जंगलवाटेवर नाही पण धबाबा धबधब्याच्या रस्त्यावर माळशेजच्या घाटात

त्याच्यासोबत पावसात जायला मिळणार होतं, पावला–पावलांवर धबधबे भेटणार होते, हिरवागार आसमंत भेटणार होता, वेगवेगळया रंगांची, आकाराची रानफुले मन रंगीत करणार होती. हे सारं तीला कायम सोबत ठेवायचं होतं आठवणी म्हणुन... रिनझिमत्या पावसात या ओल्या ऋतुच्या आठवणीमध्ये फक्त तो, ती अन् पाऊस...

रिमझिम रिमझिम रुमझुम रुमझुम
भिगी भिगी ऋत मे तुम–हम, हम–तुम ...



## ३)  पावसासमवेत वाढदिवसाची पुर्वसंध्या

पाऊस चांगलाच कोसळायला लागला होता. आता ऑफिसमधुन घरी जाता–जाता ती चांगलीच भिजणार होती, तीला आवडत होतं असं पावसात चिंब भिजणं, पण लोकांच्या नजरा. कधी–कधी याचा विचार न करता बिनधास्त अन् मुद्दाम ती भिजत जायची घरी. आज मस्त मुड होता, हा पाऊस, उदया रविवार त्यात त्याचा वाढदिवस अन् आज शनिवार म्हणजे आजही त्याच्या सुट्टीमुळे तो घरी असणार होता अगदी छान योग जुळून आला होता, उदयाच्या वाढदिवसाची सुरुवात आजच्या पुर्वसंध्येपासुन होणार होती.



सही ना! मस्त पावसात भिजुन ती घरी जाणार होती, अन् तो घरी असणार होता. एरवी त्याच्या कायमच्या नाईट शिफ्टमुळे ती ऑफिसला निघताना तो झोपलेला अन् संध्याकाळी घरी आल्यावर तो ऑफिसला गेलेला. म शब्दाविण संवादु असे आठवडयाचे पाच दिवस जायचे. तिच्या वाटयाला फक्त रविवार पुर्ण अन् शनिवारची रा

तिला पावसात भिजायला अन् त्याला पाऊस फक्त खिडकीतुन पाहायला आवडतो म्हणुनच तो काही तिला न्यायला स्टेशनला येणार नव्हता. उदयाचा त्याचा वाढदिवस, आजची पुर्वसंध्या अन् सोबतीला पाऊस. दोघंही दुर असुनही दोंघांच्याही तन-मनात हे सारं उतरलं होतं अन् दोघेही एकमेकांच्या अशा स्वागताला आसुसले होते.

घरी सर्व असणार होते तरीही त्यांच दोघांच एकमेंकाना कळेल असं मनामध्येच संवाद चालणार होता. त्याला आतुनच कळलं होतं की ती आता भिजतच पावसाला सोबत घेऊन येणार. घरी आल्यावर मग पावसाने कुडकुडलेली ती, जमलं तर घरच्यांच्या नकळत त्याच्या उबेला येणार होती.

तीची वेळ झालीच होती घरी पोहोचण्याची, घरच्यांच्या नकळत तो तीची वाट पाहत होता. बाहेर ती आल्याची त्याला कळलं आतुनच अन् नेमकी त्याचवेळी बेल वाजली. तिच्या स्वागताला तोच गेला, तीलाही तेच हवं होतं. काही क्षणच फक्त दारातच डोळयांनीच संवाद झाला. घरात येतायेताच ती मम्मी-पप्पांबरोबर बोलतच तशीच ओलेतीच बाथरुममध्ये न जाता सरळ बेडरुममध्ये कपडे बदलायला गेली. त्याला तिच्या पाठोपाठ जायचं होतं पण सर्वांच्या समोर बरं दिसलं नसतं म्हणुन मग तो काही  मिनिटे बाहेर रेंगाळला अन् किचनमध्ये गेला, नुकताच केलेला चहा गरम करायला ठेवला. चहा गरम होत असतानाच ती किचनमध्ये आली. वेव्हलेंग्थ मस्त जमली, घरात कोणालाच कळलं नाही तो तिच्यासाठी चहा गरम करायला किचनमध्ये आलाय ते अन् ती तेथे वेळेतच पोहोचल्यामुळे तीला आयता चहा देऊन तो तीचे लाड करतोय असं कोणाच्या लक्षात आलं नाही.



तीच्या ओल्या केसांतुन अजुनही पाऊस झिरपत होता, त्या झिरपत्या पावसाला त्याने तीच्या केसांवरुन हात फिरवुन थोडं कुरवाळलं अन् तीच्या ओल्या केसांबरोबर थोडीशी ओलेती असलेल्या तीला पाहत राहिला. पावसामुळे ती थंडावली होती त्यामुळे खरं तीला त्याच्या उबेला यायचं होतं पण ती ही वेळ नव्हती. घरात कोणी नसतं तर नक्कीच त्याने तीला आपल्या उबदार मिठीत घेतलं असतं अन् दोघांनीही पाऊस एंजॉय दोघांनीही केला असता.  दोघांनाही एकदमच वाटलं की खरंच आता त्यांच्या व्यतिरीक्त कोणी घरी असायला नको होतं, पण असा स्वार्थी विचार मनात आलेला आवडलाही नाही.

तीने त्याच्यासाठीही चहा घेतला अन् दोघंही ठरवुन मागे-पुढे हॉलमध्ये आले. टिव्हीवर प्रत्येक चॅनेलवर बातम्यांमध्ये पाऊस सुरु होता. पप्पा-मम्मीबरोबर बोलता-बोलता चॅनेल सर्फिंग करत होते. त्या दोघांच्या गप्पात सहभागी होत हे दोघे गॅलरीजवळ रेलत समोर डोंगर, दुरवरचं धुकं, अन् बाहेरचा पाऊस यांच्या सोबतीनं मधेच एकमेकांकडे पाहत चहाचा आस्वाद घेत होते.



चहा झाल्यावर ती स्वयपाक करायला वळली अन् पप्पांची फर्माईश आली पाऊस पडतोय, भजी करा, यावर सर्वांचंच अनुमोदन मिळालं. मग आज स्वयपाकाला बुट्टी, तसा सकाळचा स्वयपाक होताच थोडाफार अन् आताची भजी, पुरेसं होतं.

भरपेट भजीचा आस्वाद घेतल्यावर  मोजकंच जेवण झालं सर्वांचं. हॉलमध्ये पुन्हा गप्पा रंगल्या असताना ती किचनमध्ये पटापट आवरत होती. नंतर काही वेळासाठी तीही गप्पांमध्ये सामील झाली पण तीचं लक्ष त्याच्याकडे होतं तो कधी उठतोय हे ती पाहत होती. त्यालाही कळलं ती त्याची वाट पाहतेय ते, मग तोही उटला, फ्रेश होऊन बेडरुममध्ये आली.

बाहेर पावसाची रिमझिम सुरु होतीच. आता  पाऊस तीच्यासोबत आत आला. क्षणभर ती त्याच्यासमोर उभी राहिली अन् मग त्याच्या कवेत शिरली. पुन्हा त्याने केसांमधील राहीलेला पाऊस कुरवाळला, हुंगला. मगाचा पाऊस  तीच्या शरीरात थोडासा राहिला होता, त्याला बाहेर काढण्यासाठी तीला त्याच्या आणखी गच्च मिठीत जायचं होतं अन् तोही तीला आपल्या गच्च मिठीत घेवुन उब देत होता. बाहेरचा पाऊस आता जास्तच कोसळायला लागला होता.



## १) गावचा पाऊस

तीने मुद्यामच आज जुन्या लुगड्याच्या पदराच्या फडक्यात भाकरी बांधुन दिली. जेवताना पदराचं फडकं पाहून तरी त्याला सुचावं की घरला लवकर जाया पायजे.

दाटून आलेल्या पावसागत ती सुदीक दाटून भरुन आली व्हती. पन एवढ्या गोतावळयात दिसा–उजेडी मनाजोगतं कुठं बोलायला मिळावं म्हणुन तीला ही पदराच्या फडक्यात न्याहारी बांधुन दयायची युगत आठवली.



हयो पावसाळा पयलाच तीच्या लग्नानंतरचा म्हणुनच जास्त हुरहुर लागुन राहयली. लग्नाआधीच्या पावसात ती मैतरनीसंगट लय हुंदडली. पावसा–पान्याचं हिरीवर जा, जित्राबं घेऊन गायरानावर जा. परतेक येळी असा येगयेगळा पाऊस तीनं अनभवलेला, त्या पावसाचा गंध, ओलावा, दिसापुढं दिसं गेल्यावर चढत गेलेला हिरवा रंग, येणाऱ्या पुढल्या पावसापत्तुर मनात साठऊन ठेवलेला. आताचा पाऊस येगळाच होता, या पावसाला एक येगळाच गंध होता जो तीला तीच्या धन्याच्या जवळपास वावरताना यायचा.

अवघा एकच महिना सरला होता आताच लग्न होऊन ती नवी नवरी म्हणुन घरात आली, अजुन कवतिकच होतं होतं तीचं. कायबाय येगळं हुरहुरणार वाटत होतं, पन वागण्यावर बंधनं आली व्हती. आयकडं असताना कशी बी हुंदडणारी आता ती  एकदम गपचीप झाली व्हती.





यासाली पाऊस येळंवर आला, घरची शेती, तर घरातली समदी शेतावर जातं व्हती, फकस्त ती आन तीची सासु मागं राहात व्हती. सकाळच्याला भक्कम न्याहारी करुन समदी शेताकडं गेल्यावर दुपारचं जेवण सासु घेऊन जायाची शेतावर, मग घरी ती एकलीच.



घरातली सारी कामं आटपुन ती पुढल्या दारी उभी व्हती. वातावरण ढगाळलेलं, वारा सुटलेला आन टप टप सरी पडाया लागल्या. आलेल्या सरी इतक्या वेडयावाकडया होत्या की तीही थोडीशी भिजलीच. खुप वाटलं मनातुन असंच जावं आन अंगणात उभं राहावं, पाऊस अंगावर घ्यावा, ओलंचिंब भिजुन जावं. पाऊल बाहेर टाकणार तेवढ्यात चटकन भान आलं ती आता सासरी आहे. मन बंड करत होतं पावसात जाण्यासाठी मग ती तशीच दारात उभी राहिली पाऊस बघत मातीचा गंध श्वासात घेत. वाऱ्याबरोबर येणाऱ्या गंधात आन पावसाच्या बारीक शिडकाव्यात भिजत राहिली. बाहेर लहान पोरं पावसात खेळत होती, त्यांना पाहून तीला तीचं बालपण आठवल. बराच वेळ असं उभं राहिल्यानं थोडी रग लागायला लागली.



तीनं घरापाशी येणाऱ्या वाटंकडं बघितलं, दुरवरुन कोण तरी येत असल्याच दिसत होतं, पावसाच्या पडद्यामुळं कोणं ते कळत नव्हतं. ती परत अंगणाबाहेर टपटपणाऱ्या पावसाकडे बघू लागली. तीच्या खांद्याला कोणाचातरी स्पर्श झाला. समोर तीचा धनी उभा होता, पावसात ओलाचिंब भिजलेला. ती त्याच्याकडे एकटक पाहत राहिली, त्यानेच भानावर आणलं तीला. म्हणाला, “घरी तु एकलीच आहेस, पाऊस आलाय, घाबरशील म्हणुन आयनं मला घरी धाडलं. बाकी सारी येतील त्यांच्या त्यांच्या येळंला तासा–दिडतासानं. मी मागच्या अंगणात जातो, तु पण तेथे ये.” अन् तो वळला मागील अंगणात जायला. तीला आधी त्याचं वागणं कळलंच नाही तरी जास्त विचार न करता ती मागील दारी गेली. तो अंगणात भिजत होता मनसोक्त, तीलाही त्याने बोलावलं. पण नंतर घरी समजलं तर सारे काय म्हणतील असा विचार करत ती त्याला नाही म्हणत राहिली. शेवटी त्यानेच तीच्या हाताला धरुन बाहेर खेचलं अन् ती पुन्हा आत जाऊ नये म्हणुन हात गच्च धरुन ठेवला. ती बावरली त्याच्यापुढे, पण पावसात भिजायला मिळत होतं अन् तेही त्याच्यासोबत म्हणुन मनातुन हरखलीही होती. तो म्हणालाच, “तुलाही माझ्यासारखंच पावसात भिजायला आवडतं ना? मला जमेल तसं मी तुला पावसात भिजायला घेईन माझ्यासोबत, घरच्यांच्या नकळत.”



## १) बाल्य

ऐ आई मला पावसात जाऊ दे ।
एकदा तरी भिजुनी मला चिंबचिंब होऊ दे ॥

असं गाणं म्हणुनही आईला विनंती करुन झाली पण आईनं चिडून तंगडं मोडण्याची धमकी देऊन गप्पपणे अभ्यास करायला बसवलं.





शाळेतुन येतानाच मस्त भिजुन झालं होतं, रस्त्यातल्या डबक्यात उड्या मारुन ते पाणी पायानं उडवणं झालं होतं. फक्त राहिलं होतं इतक ंच की  कागदाच्या होड्या बनवुन रस्त्यावरच्या वाहत्या पाण्यात सोडायच्या होत्या, पण आई घाई करत होती घरी जाण्यासाठी.

सकाळी पाऊस नव्हता. उगाच ओझं नको म्हणुन रेनकोट घेतला नाही सोबत अन् शाळेतुन परत येतानाही पाऊस नव्हता म्हणुन आईनेही छत्री-रेनक ोट आणली नाही. पाऊस मस्त भरुन आला, मग आईने हात धरलेला असुनही डबक्यात उड्या मारल्या अन् तीच्या अंगावर पाणी उडवलं तसं ती चिडली, रस्त्यात जास्त  क ाही बोलली नाही पण घरी आल्यावर चांगलीच तंबी दिली.

घरात बसुन छपरावर पडणाऱ्या पावसाचा टपटप आवाज ऐकुण आणि खिडकीतुन पावसाच्या रेघांचा पडदा पाहताना मन पावसाकडे धावत होतं. किती छान वाटतं पावसात भिजायला. खुप पाऊस पडला तर शाळाही लवकर सोडतात, कधी कधी तर शाळेला सुट्टी पण देतात, मज्जा ना!



वर्गात टिचर शिकवत असताना आपलं लक्ष बाहेरच्या पावसाकडेच असतं. पडणारा पाऊस, छजवळची पगळ, खिडकीआत डोकावणाऱ्या ओल्या झालेल्या झाडांच्या फांद्या, फांद्यांची भिजलेली पानं, पानांच्या टोकावरुन निथळणारे पावसाच्या पाण्याचे थेंब, पावसाच्या सरळ खाली येणाऱ्या रेघा हे सारं डोळयासमोर येत होतं. वर्गात खिडकीजवळ बसत असल्यामुळे अंगावर येणारे पावसाचे शिंतोडे, तेवढंच सुख वर्गात असताना पाऊस अंगावर घ्यायचे. टिचरच्या नकळत वहीचं पान फाडून होडी बनवली अन् खिडकीतुन खाली पावसात सोडणार इतक्यात टिचरने पाहिलं. झालं शिक्षा मिळाली, खिडकीकडे पाठ करुन उभे राहण्याची, मज्जाचं आली, बाहेरच्या पावसाचा शिडकावा पाठीवर होत होता.

शाळा सुटल्यावर न्यायला आलेल्या आईला बोलावुन टिचरनी कागदाच्या होडीची गोष्ट सांगितली त्यामुळे आईच्या रागाचा पारा चढलेला.

अभ्यास करत करत बाहेर पावसाकडे बघताना, अभ्यास करता करताच झोप यायला लागली नकळत तो तेथेच पुस्तकावर डोकं ठेवुन झोपुन गेला. जाग आली तेव्हा आई त्याच्या उशाजवळ बसुन त्याच्या डोक्यावर मिठाच्या पाण्याच्या घड्या ठेवत होती. पावसात भिजल्यामुळे सर्दीबरोबर ताप सुद्धा सोबतीला आला होता. तो जागा झाल्याचं पाहताच आई बोलत होती “मी सांगत होते, पावसात भिजु नकोस, चिखलाच्या घाण पाण्यात खेळू नकोस .......”. त्याचं आईच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं, तो बाहेर पाहत पावसाचा अंदाज घेत होता, पाऊस सुसाट आहे? मध्यम आहे? की रिमझिम आहे?





## ६) उत्तरार्ध

कर हा करी धरीला शुभांगी .... आजोबा गुणगुणत होते. शेजारीच बसलेल्या अर्धांगिनीचा – आजींचा हात हातात होता, दोघेही खिडकीतुन दिसणारा बाहेरचा पाऊस पाहत होते. आताचं त्यांच्याबरोबरचं वातावरण त्यांच्या वयोमानानुसार त्यांच्यासाठी रोमँटिक झालं होतं.



सर्व कामे आटोपल्यावर सोफ्यावर बसुन निवांत गप्पा मारणे हा त्यांचा मागच्या काही वर्षांपासुनचा शिरस्ता. पावसाळा सुरु झाला कि गप्पा मारता मारता, बाहेरचा पाऊस, मळभ, आलेलं आभाळ हे सारे पावसाचे विभ्रम पाहता पाहता मागचे पावसाळे ते दोघं पुन्हा जगायचे.

“किती वर्ष झाली गं आपण एकत्र पाऊस अनुभवतोय?” आजोबांनी मुददामचं विचारलं, उत्तर माहिती असुनही.



“आपली भेट झाल्यावर पहिल्या पावसाळयात तुझ्या वाढदिवसाला मी तुला विश करायला तुझ्या घरी आले होते तो आपला पहिला पाऊस, तेव्हापासुन तुच मोज ना कि ती पावसाळे. हा पहिला पावसाळा मोजलास ना की त्यानंतरचे पावसाळे मोजु नकोस, त्या सात पावसाळयात आपल्या भेटीच झाल्या नाहीत. आठवतं तुला त्या सातव्या पावसाळयात काही कारणांमुळे आपल्यात दुरावा आला होता, तु मला तुझ्यापासुन दुर केलं होतंस, तेव्हा मी एकदम आस्तित्वशुन्य झाले होते, आता आपलं काय? कसं जगायचं तुझ्याशिवाय? या अन् असाच प्रश्नांत मी भरकटत होते तेव्हा. हा कसोटीचा काळ संपला, पन्हा एकत्र आलो, तरीही खुप अडचणी होत्या, त्यातुन परिस्थितीनेच मार्ग दाखवला अन् आपण एकमेंकासोबत राहिलो ते आजतागायत. मात्र तो पावसाळा मी कधीच विसरु शकत नाही. त्यावेळी मला वाटतं होतं, माझं तुझ्यावर प्रेम आहे ही आयुष्यातील माझी मोठी चुक आहे का? पण ती चुक नव्हती हे तु सिद्ध करुन दाखवलंस.” आजी बोलता बोलता नॉस्टालजिक झाल्या, आजोबांनी सावरलं.

आजोबा विषय बदलण्यासाठी म्हणाले, “नाही मोजत मी ते सात पावसाळे, त्याच्यापुढचेच मोजतो, पंधरा..., वीस..., च्योवीस, अरे पुढच्या वर्षी आपल्या दोघांचा पाऊस रौप्य महोत्सवी होईल”. “ऐ, आपण हे रौप्य महोत्सवी वर्ष सेलिब्रेट करु पावसासोबत. नेरळला आपल्या फार्म हाऊसला जाऊ दोघेच, तुला आवडतं ना पावसातलं माथेरान पाहायला, तरुण वयात पावसात कितीतरी वेळा माथेरान हुंदडलीस, तेव्हा मी नसायचो तुझ्यासोबत माझ्या कामामुळे, नेमका त्याचवेळी माझा कामाचा पीक पिरियड यायचा ना त्यामुळे मी तुला वेळ देऊ शकायचो नाही, मला जाणवायची तुझी नाराजी, कारण तुला मी आणि पाऊस असे दोघेही सोबत हवे असायचो, त्यात शनिवार रविवार सुट्टी असली तरी त्यावर घरातील इतरांचा आणि मित्र–मैत्रिणींचा पगडा असायचा, तुझी चिडचिड व्हायची, तरी तु मला सहन करायचीस, हे सारं आता आठवलं कि गिल्टी वाटतं फार कि तुझा हक्काचा असलेला माझा वेळ मी तुला दयायचो नाही.”



हं! आजी म्हणाल्या, खरं आहे ते, अरे पण मला एका गोष्टीचं समाधान मिळत होतं, तु माझा आहेस, माझ्या सोबत आहेस, अन् माझ्या आयुष्याच्या अंतापर्यंत तु माझ्यासोबत राहणार आहेस.” “तुला आठवतं का रे? खुप वर्षांपुर्वी मला पडलेलं स्वप्न, मी तुला सांगितलं होतं, असंच तुझ्या खांदयावर माझं डोकं असताना चटकन माझा प्राण निघुन गेला, हे स्वप्न खरं व्हायला हवं ना!”

आता आजोबा ओरडलेच, “उगाच असलं काही बोलु नकोस, बघं तुझं असलं काही ऐकुण पाऊस सुद्धा रागाने जोरात कोसळायला लागलाय, चल, खिडकी बंद करुया, पण तो खिडकीवर धडका देत बसेल आपल्यासोबत आत येण्यासाठी.”

“आपण जेव्हा तो सोबत असताना चांगलं बोलतो ना तेव्हा तो छान रिमझिमत बरसतो, जरा त्याला सोडून जाण्याची भाषा केली की लगेच बिथरतो तो. कदाचित कोणत्यातरी एका पावसाळयात आपण तिघे एकत्रच निघु परतीच्या प्रवासाला”. आजी बोलल्याच पुन्हा असं ग्रे शेडचं वाक्य. आजोबा रागाने उठले आणि आत जाऊ लागले, त्याचवेळी पावसाचा जोर आणखीनचं वाढला.

